**अंतिम कारणे दाखवा नोटीस**

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**

जा.क्र.आरोग्य/आस्था-5/ 50 /2019

नाशिक दिनांक :- 22 / 1 /2019

प्रति

श्रीम.मंदाकिनी शिवाजी गायकवाड,आरोग्य सेविका (म)
प्रा.आ.केंद्र.भारम,(ओपीडी) ता.येवला.
व्दारा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,येवला.

आपण आरोग्य सेविका या पदावर प्रा.आ.केंद्र भारम,(ओपीडी), ता.येवला येथील कार्यरत या ठिकाणी सन- मे 2017 मध्ये झालेल्या प्रशासकिय बदली होऊनही बदलीचे ठिकाणी हजर न होता दि.01/06/2017 ते दि.01/12/2017 असे 184 दिवस अनाधिकृत गैरहजर राहीलेल्या आहात व वरिष्ठांचे आदेशाची अवमानना केलेली आहे. या कारणास्त्व आपणा विरुध्द खाते चौकशी सुरु करणेसाठी याकार्यालयाचे जा.क्र.आरोग्य/अस्था-5/80/2018 दिनांक 25/01/2018 अन्वये ज्ञापन व दोषारोप परिशिष्ट 1 ते 4 देण्यात आले होते.आपण विहीत मुदतीत ज्ञापनाचा खुलासा सादर न केल्याने आपणा विरुध्दचे दोषारोपांची सविस्तर चौकशी करण्यासाठी या कार्यालयाचे आदेश क्रंमाक आरोग्य/आस्था-5/185/2018 दि. 01/03/2018 अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग,नाशिक यांचे कडील पत्र क्र.विशा.4/खाचौ/सी.आर.67/2018 दिनांक 02 नोव्हेबर, 2018 अन्वये चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालाआहे. दोषारोप निहाय चौकशी अधिकारी यांचे अभिप्राय खालील प्रमाणे.

| दोषारोप क्रमांक | दोषारोपाचे स्वरुप | चौकशी अधिकारी यांचा अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | मे 2017 मध्ये झालेल्या प्रशासकिय बदलीचे ठिकाणी हजर न होता दि.01/06/2017 ते दि.01/12/2017 असे 184 दिवस अनाधिकृत गैरहजर राहणे | अनाधिकृत गैरहजेरी सिध्द होत नाही |
| 2 | वरिष्ठांचे आदेशाची अवमानना करणे | सदरचा आरोप देखील सिध्द होत नाही |

चौकशी अहवालातील दोषारोपातील निष्कर्षात तुमचे विरुद्धचे 02 ही आरोप हे जरी सिध्द होत नाही असे नमुद केलेले आहे. तरी चौकशी अहवालास शिस्त विषयप्राधिकरण हे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) 1964 भाग 3 नियम -6 (10) नुसार सहमत नाही. कारण जर आपण आजारी होता तरआपण तसे कार्यालयास पुर्व कल्पना देवुन वैद्यकिय कारणास्तवची रजा उपभोगण्यास मान्यता मिळावी असा कोणताही अर्ज केला नाही हे चौकशी मध्ये दिसुन आले,त्यामुळे कार्यालय प्रमुखांचे पुर्व परवानगी न घेता कामी अनाधिकृत गैरहजर राहून महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 कलम-10 चा भंग केला आहे. त्यामुळे आरोप क्रमांक-1 हा सिध्द होतो. वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे आपणास बदली झाल्यामुळे कार्यमुक्त करुनही आपण कामी हजर न झाल्याने वरिष्ठांचे आदेशाचा अवमान केला हा दुसरा आरोपही सिध्द होत आहे. यावरुन आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चा भंग केला आहे हे सिद्ध होते. चौकशी अहवालाची प्रत यासोबत जोडुन पाठविणेत येत आहे.चौकशी अहवालाशी शिस्तभंग विषयक प्राधिकरण नमुद कारणांमुळे असहमत झाले असुन खाते चौकशी प्रकरणी आपणास शास्ती होणेबाबत शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणुन माझे मत पक्के झाले आहे.

त्यास्तव आपले विरुध्द **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) 1964 भाग 3 नियम ~~4~~ 4 चा (दोन) - नुसार** - दोन वेतनवाढी कायम स्वरुपी बंद का करण्यात येवु नये **अशी शिक्षा का करण्यात येऊ नये** याबाबतचा आपला लेखी खुलासा ही नोटिस मिळाले पासुन 15 दिवसांचे आंत पुराव्याचे दस्ताऐवजांसह इकडेस सादर करावा. तसेच आपणांस समक्ष अजुनही काही लेखी व तोंडी पुरावे सादर करावयाचे असल्यास ते वरील मुदत्तीत सादर करावेत. खुलासा मुदतीत सादर केला नाही तसेच समाधानकारक नसल्यास आपणास प्रस्तावित केलेली शिस्तभंगाची कार्यवाही मान्य आहे असे गृहीत धरुन शिक्षेचे आदेश पारित करणेस येईल याची नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

**प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती,येवला**

2/- सोबत अंतिम कारणे दाखवा नोटीसच्या तीन प्रती जोडल्या आहेत. त्यातील एक प्रत श्रीम.गायकवाड, आरोग्य सेविका (म) यांना (चौकशी अहवालाचे प्रतीसह) बजाविणेत येवुन दुसऱ्या प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन सदर पोहोची प्रत इकडेस सादर करावी. तसेच तीसरी प्रत ही आपले कार्याल्यात पुराव्याकामी जपून ठेवावी.

स्वाक्षरी XXX

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**